**दिनांक २८.४.२०२२ रोजीच्या अधिसूचनेन्वये तसेच दिनांक २ जून, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारित वेतनश्रेणीमध्ये वेतननिश्चिती करताना वेतन कमी निश्चित होत असल्यास ते पुढील टप्प्यावर निश्चित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : वेपुर-११२५/प्र.क्र.२८/सेवा-९**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- १९ डिसेंबर, २०२५

**संदर्भ :-** १. शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्रमांक वेपुर-२०१९/प्र.क्र.२९/सेवा-९ दिनांक २८ एप्रिल, २०२२
२. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : वेपुर-१११९/प्र.क्र.०१/सेवा-९, दिनांक २ जून, २०२५

**प्रस्तावना :-**

वित्त विभागाच्या संदर्भ क्र.१ येथील दिनांक २८ एप्रिल, २०२२ रोजीच्या शासन अधिसूचनेन्वये सातव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीत एस-२७ : ११८५००-२१४१०० या ऐवजी १२३१००-२१५९०० अशी सुधारणा करण्यात आली आहे. तसेच संदर्भ क्र.२ येथील दिनांक २ जून, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये वेतनत्रुटी निवारण समिती २०२४ (खुल्लर समिती) च्या शिफारशीनुसार ७१ संवर्गांच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. वित्त विभागाच्या दिनांक २८ एप्रिल, २०२२ रोजीच्या अधिसूचनेन्वये व दिनांक २ जून, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारित वेतनश्रेणी मध्ये वेतननिश्चिती करताना पूर्वीच्या असुधारित वेतनश्रेणीमधील वेतनापेक्षा कमी टप्प्यावर वेतन निश्चित होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे. त्यामुळे सदर कर्मचाऱ्यांचे वेतन संरक्षित करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने आता पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

Scanned with OKEN Scanner

**शासन परिपत्रक :-**

वेतनत्रुटी निवारण समिती २०२४ (खुल्लर समिती) ने केलेल्या शिफारशीनुसार दिनांक १३.२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारित वेतनश्रेणीमध्ये वेतननिश्चिती करताना ज्या अधिकारी/कर्मचाऱ्याचे पूर्वीच्या असुधारित वेतनश्रेणीतील वेतनापेक्षा सुधारित वेतनश्रेणीमध्ये वेतन कमी निश्चित होत असल्यास अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांची त्या वेतनश्रेणीत पुढील टप्प्यावर वेतननिश्चिती करण्याबाबत वित्त विभागाच्या दिनांक २ जून, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

त्याच धर्तीवर वित्त विभागाच्या दिनांक २८ एप्रिल, २०२२ रोजीच्या अधिसूचनेन्वये तसेच दिनांक २ जून, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारित वेतनश्रेणीमध्ये वेतननिश्चिती करताना ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचे सुधारित वेतनश्रेणी लागू करुन वेतननिश्चिती करतेवेळी जर वेतन पूर्वी पेक्षा कमी होत असेल तर अश्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना त्या सुधारित वेतनश्रेणीत पुढील टप्प्यावर वेतन निश्चित करावे.

सदर प्रत्येक प्रकरणी लेखा व कोषागारे कार्यालयातील वेतन पडताळणी पथकाने काटेकोरपणे तपासणी करुन, तद्नंतरच वेतननिश्चिती अंतिम करुन पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२५१२१९१६४४०९९४०५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MUGDHA NITIN DHURI

Digitally signed by MUGDHA NITIN DHURI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Finance Dept, 2.5.4.20=CF57B0402DF957A7D20B0519258771CB1D70227A5D6A66673B7656596A962B41, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=43B82982D7CE8CB63F33F9D9AE085C7E452884CA6ED537080698D26F9BE61D71, cn=MUGDHA NITIN DHURI
Date: 2025.12.19 16:46:20 +05'30'

**( मुग्धा नि. धुरी )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

| | |
|---|---|
| मा. राज्यपालांचे सचिव<br>मा. मुख्यमंत्री यांचे सचिव<br>मा.उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव<br>सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव<br>विधानसभा/विधानपरिषद विरोधी पक्ष नेता<br>सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई<br>मंत्रालयीन सर्व विभाग | निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.<br>सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,<br>लेखा अधिकारी, वेतन पडताळणी पथक,<br>मुंबई / नागपूर / पुणे / औरंगाबाद,<br>मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका.<br>कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड,<br>खडकी / देहू रोड/ देवळाली/ अहमदनगर. |

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| मंत्रालयीन सर्व विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख<br># प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.<br># प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई. #सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.<br># सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई. #प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई.<br># आयुक्त राज्य माहिती आयोग, (सर्व)<br># सचिव राज्य निवडणूक आयोग, मुंबई.<br># प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/औरंगाबाद.<br>राज्य महिला आयोग, वरळी, मुंबई.<br>सर्व विभागीय आयुक्त.<br>सर्व जिल्हाधिकारी.<br>सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.<br>महासंचालक, यशदा, राजभवन आवास, पुणे. | कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी.<br>कुलसचिव, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.<br>कुलसचिव, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.<br>कुलसचिव, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.<br>कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई,<br>कुलसचिव, सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.<br>कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.<br>कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.<br>कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.<br>कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.<br>कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.<br>कुलसचिव, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.<br>श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई. |

Scanned with OKEN Scanner